# भारतातील महिला सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची सद्यस्थिती

**प्रा. सुनील बी. उईके**
आठवले समाजकार्य महाविद्यालय भंडारा
मो. नं. ८१४९३६५८१७

**सारांश:-**

स्त्री ही मानवी सजीव सृष्टीची जननी आहे. तसेच ती मानवाच्या उत्पत्तीची जननी सुद्धा आहे. स्त्री व पुरूष या निसर्गाने निर्माण केलेल्या मानवी जाती परस्परावलंबी आहेत. म्हणूनच संसाराचा रथ योग्य पद्धतीने चालविण्यासाठी स्त्री व पुरूष या दोघांचीही भुमिका महत्त्वाची असते. कोणत्या एकट्याने संसाराचा रथ योग्य पद्धतीने चालू शकत नाही. दोघेही महत्त्वाचे असले तरी समाजामध्ये महिलांच्या तुलनेत पुरूष यांना महत्त्वाचे स्थान आणि दर्जा देण्यात आलेला आहे. याच कारणांमुळे महिला पुरूशांच्या तुलनेत मागे पडलेल्या आहेत. महिलांमध्ये स्व: जाणिवांचा विकास करणे, तिच्या हक्क व अधिकारांविषयी तिला जागृत करणे, तिला निर्णय घेण्यास सक्षम बनविणे यासाठीच शासनाने महिला सक्षमीकरणाचे धोरण स्विकारले आहे. 2011 हे वर्ष भारताने महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून साजरे केले. यावर्शी देशातील महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या सशक्त बनविण्यासाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**प्रस्तावना:-**

"भारतीय ज्ञान आणि महिला सशक्तीकरण" (Indian knowledge and women empowerment) या संकल्पनेत **भारतीय परंपरा, मूल्ये आणि ज्ञानाचा वापर करून महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनवणे** अभिप्रेत आहे. महिला सशक्तीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनाशी संबंधित सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षम करणे आणि समाज व देशाच्या विकासात समान भागीदार बनवणे. भारताच्या प्राचीन इतिहासात गार्गी आणि मैत्रेयीसारख्या विदुषी महिलांची उदाहरणे आहेत, ज्यांनी शिक्षण आणि तर्कशास्त्रात मोठे योगदान दिले. यावरून असे दिसून येते की भारतीय ज्ञानाच्या परंपरेत महिलांना नेहमीच सन्माननीय स्थान होते. तथापि, नंतरच्या काळात सामाजिक उतरंडीमुळे महिलांच्या स्थितीत घसरण झाली.

मानवी समुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्री हीच मानवाच्या उत्पत्तीची जननी आहे. स्त्री आणि पुरूष जन्मतः दोघेही नैसर्गिक दृष्ट्या समान आहेत. परंतु मानव निर्मित समाजव्यवस्थेने समाजाचे लिंगभेदाच्या आधारावर स्त्री-पुरूशांमध्ये समाजाचे श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे दोन भागात विभाजन केले. भारतामध्ये स्त्रियांना आदिशक्ती, दुर्गा, पुरूशांची अर्धांगिनी अशी उपमा देऊन तिचा गौरव केल्या जाते. तिची नवरात्री दरम्यान नवकन्या, नवदुर्गा म्हणून पुजा केली जाते. परंतु हा फक्त समाजाचा एक दिखावा आहे. कारण समाजामध्ये विषेशतः कुटुंबामध्ये पुरूशांच्या तुलनेत स्त्रियांना गौण स्थान देण्यात आले आहे. तिला तिच्या अनेक प्रकारच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. हे आपल्याला वैदिक काळ, मध्ययुगीन काळ, स्वातंत्र्यापुर्वीचा काळ आणि स्वातंत्र्यानंतरचा काळ अशा प्रत्येकच काळात दिसून येते. स्त्रियांचे क्षेत्र फक्त 'चुल आणि मुल' इतकेच मर्यादित करण्यात आले आहे. स्त्रियांनी फक्त कुटुंब योग्य प्रकारे सांभाळले पाहिजे यातच कुटुंबाची शोभा असते. अशी समाजाची अपेक्षा असते. याचा असा परिणाम झाला की, स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय धार्मिक आणि शैक्षणिक विकास होऊ शकला नाही. ही परिस्थिती केवळ भारताचीच नाही तर संपुर्ण जगामध्ये याच प्रकारचे चित्र दिसून येते. म्हणूनच स्त्री ही पुरुषाप्रमाणे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम व्हावी म्हणून सर्वप्रथम 1985 मध्ये 'नैरोबी' येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला संम्मेलनामध्ये महिला सक्षमीकरणाचे बिजारोपन करण्यात आले. त्यानंतर भारताने सुद्धा 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून जाहीर केले. महाराष्ट्र शासनाने सुद्धा 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष माणले.

**महिला सक्षमीकरण म्हणजे काय?:-**

योजना, कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि कौटुंबिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये निर्णयक्षम बनविणे, स्त्री-पुरूष असमानता नष्ट करणे, स्त्रियांना पुरुषांसारखी विकासाची संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना स्वतःच्या अधिकारांप्रती जागृत करणे होय. ज्याप्रमाणे पुरूष हा मानव प्राणी आहे, त्याचप्रमाणे महिला देखील एक मानव प्राणीच आहे. ती पुरूशांपेक्षा वेगळी नाहीती सुद्धा पुरुषांप्रमाणे निर्णय घेण्यास सक्षम आहे. ही भावना तिच्यामध्ये रूजविणे होय. कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासाठी संधी उपलब्ध करून देणे, आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

**महिला सक्षमीकरण आणि महिलांची सद्यस्थिती:-**

**1) सामाजिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती:-** पुर्वीपेक्षा आज महिलांच्या समाजिक दर्जामध्ये खूप सुधारणा झाले असल्याचे दिसून येते. त्या आज परंपरागत अनिष्ट झाल्यावर पतीवर आणि वृद्ध झाल्यावर मुलांवर अवलंबून असायच्या. पुरुषांनी आर्थिक कामे करावी व महिलांनी चुल आणि मुल सांभाळावी अशी समाजाची पूर्वी अपेक्षा होती. परंतु आज मात्र स्त्रिया स्वावलंबी व आत्मनिर्भर बनत आहेत. ती आज उच्च शिक्षण घेऊन अर्थार्जन करीत आहे. आजच्या प्रशासकीय, वैद्यकीय, पोलीस प्रशासन, न्यायालयीन व्यवस्था, उद्योग आणि व्यापार अशा सर्वच ठिकाणी त्या दिसून येत आहेत. महिला आज स्वतंत्र व आत्मनिर्भर असल्याने त्या कोणावरही अवलंबून नाहीत

**3) शैक्षणिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती:-** स्वातंत्र्यापुर्वीच्या काळात महिलांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती. परंतु आज महिलांनी शिक्षणात खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. 1951 च्या जनगणनेमधे महिलांचे शिक्षणाचे प्रमाण फक्त 8.86 टक्के होते, तर 2011 च्या जनगणनेमध्ये महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण 65.46 टक्के आहे. आज महिला सर्वच क्षेत्रातील शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. म्हणून आज ती प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, अभियंता, राजकीय पदाधिकारी अशा अनेक पदावर काम करीत असल्याचे दिसून येते.

**4) राजकीय क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती:-** महाराष्ट्र शासनाने स्थानिक निवडणुकीत महिलांना 50 टक्के आरक्षण दिले आहे. यामुळे तळागाळातील महिलांना देखील राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे. भारतामध्ये 2009 च्या 15 व्या लोकसभा निवडणुकीमध्ये 52 महिला वेगवेगळ्या राजकीय पक्षांतून निवडून आलेल्या होत्या. 2014 च्या 16 व्या लोकसभा निवडणुकीमध्ये 64 तर 2019 च्या 17 व्या लोकसभा निवडणुकीत 78 महिला खासदार म्हणून निवडून आल्या आहेत.

**5) कौटुंबिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती**:- स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात भारतामध्ये प्रामुख्याने संयुक्त कुटुंब पद्धती होती. या संयुक्त कुटुंबामध्ये पुरुषी सत्ता होती परंतु आज भारतामध्ये संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन त्याची जागा विभक्त कुटुंबाने घेतलेली आहे. या कुटुंबात आता तिची भुमिका दासीसारखी न राहता ती कुटुंब प्रमुखाची सहचारी बनत आहे. ती आज कुटुंबातील सर्वच निर्णय प्रक्रियेत भाग घेत आहे. म्हणूनच आज तिला कुटुंबात सन्मान मिळत आहे.

**महिला सक्षमीकरणाचे पैलू:**

- **शिक्षण:** मुलींना शिक्षणाची समान संधी मिळणे, ज्यामुळे त्या साक्षर होऊन आत्मनिर्भर होतील.
- **आर्थिक:** नोकरी, व्यवसाय आणि आर्थिक संसाधनांवर नियंत्रण मिळवणे, बचत गट आणि उद्योजकतेतून आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे.
- **सामाजिक:** समाजात समान दर्जा मिळवणे, रूढीवादी विचारांना आव्हान देणे आणि सुरक्षित वातावरणात जगणे.
- **राजकीय:** निर्णय प्रक्रियेत भाग घेणे, नेतृत्व करणे आणि राजकीय हक्क बजावणे.
- **आरोग्य:** पुनरुत्पादक आरोग्य, माता आरोग्य आणि एकूणच कल्याणासाठी आवश्यक माहिती आणि सेवा मिळवणे.

**सक्षमीकरणाचे महत्त्व:**

- **आत्मनिर्भरता:** महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करते.
- **समान संधी:** स्त्री-पुरुष असमानता दूर करून सर्वांना विकासाची समान संधी मिळते.
- **समृद्धी:** कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा सर्वांगीण विकास होतो.
- **निर्णय क्षमता:** महिलांना त्यांच्या आयुष्याबद्दल आणि परिसराविषयी निर्णय घेण्याचा अधिकार मिळतो.

**बचतगटाची स्थापना आणि इतिहासः-**

स्वयं सहाय्यता बचतगटाची संकल्पना सर्वप्रथम बांग्लादेशात महिलांसाठी साकारण्यात आली आणि याच पार्श्वभूमीवर भारतात स्वयं सहाय्यता बचतगटाच्या संकल्पनेचा पुरस्कार थोडया फार प्रमाणात संशोधन करून स्विकारण्यात आले. आंध्रप्रदेश आणि केरळ या राज्याचा प्रगती पासून शासनाने सन 1928-1929 या वर्षात स्वयं सहायता बचतगट स्थापना करण्यात पुढाकार केला. बांग्लादेशात सर्वप्रथम थोडया प्रमाणात का होईना पण महिलांनी संगठित व्हायला पाहिजे आणि काटकसरीने का होईना पण थोडी बचत करायला पाहिजे. बचत करून व ती गोळा करून एका सुरक्षित ठिकाणी (बँक) मध्ये जमा करायला पाहिजे. जेणेकयन त्याच्या आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक जीवनातील समस्या दूर करण्यात मदत होईल. हया प्रेरणेने बांग्लादेशात महिलांची स्वयं सहायता बचतगटाची स्थापना करण्यात आली. तसेच महिलांची सर्वात मोठी बँक (सहायता बचत गटाची) ही बांग्लादेशात आहे.

**बचतगट योजनेची संकल्पनाः-**

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P110
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

संकटकालीन वेळेस एक दुसरे व परस्पर लोकांना आपल्याच सामुहिक बचतीने आर्थिक सहायता देणे, आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी जमापुंजी तयार करणे, सामाजिक प्रश्नांची संबंधित विचार व कृती करण्यासाठी संगठित करणे, संगठीत लोकांची शक्ती व आत्मविश्वास वाढविण्यासाठी एक दुसऱ्याच्या सहकार्याने तयार केलेल्या गटांना स्वयं सहायता अल्गत किंवा स्वयं सहायता बचतगट असे म्हटल्या जाते.

**स्वयंसहायता महिला बचतगट:**

आपल्या उत्पन्नातील काटकसर करून बचत करून त्याद्वारे सभासदांना गरजेनूसार कर्ज रूपाने पैसे देणे, कर्जाची परतफेड करणे, व्यवसाय करणे, वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणी करणे, विमा, उत्पादनवाढीसाठी वैयक्तीक व सामुहिक उद्योग निर्माण करणे. सर्व सदस्य आत्मनिर्भर बनणे अशा समुहास स्वयंसहायता गट म्हणतात. हा प्रकार सर्व व्यापक असून या गटांचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणात होत आहे.

सर्वार्थाने साधम्र्य असणाऱ्या सभासदानी वाजवी, संख्येने, स्वेच्छेने एकत्र येवून सर्वांगिण उन्नतीकरीता बनविलेला व चालविलेला समुह म्हणजे स्वयंसहायता गट होय. परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वच्छेने, संमतीने सामुदायिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहायता बचत गट होय. जीवनातील नव्या नव्या आव्हांनाना व जबाबदाऱ्यांना पेलण्यासाठी क्षमता विकसित करणारा सुसज्ज संच म्हणजे स्वयंसहायता बचत गट होय. एकच वाडी-वस्तीवरील, एकाच सामाजिक, आर्थिक स्तरावरील समविचारी, समान गरजा असणाऱ्या 10 ते 20 महिलांच्या संघटनेस स्वयंसहायता गट म्हणतात.

**स्वयं सहायता बचतगटाची उदिष्ट्ये:**

1) समाजातील आर्थिक कमजोर सामाजिक घटकांना स्वावलंबी बनविणे.
2) गटाचा मुख्य उद्देश सभासदांना सक्षम करणे हा आहे.
3) महिलांना आर्थिक व्यवस्थापनासाठी संधी देणे.
4) निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे.
5) सावकारी पद्धती पासून मुक्त करणे.
6) महिलांचा आर्थिक विकास करणे.
7) महिलांना आर्थिक व मानसिक आधार देऊन त्यांच्या सामाजिक दर्जा उंचाविणे.

**महिला बचत गटाचे ध्येय:-**

महिलांचे सक्षमीकरण घडवून आणणे.

**उद्दीष्टे:-** १) महिलांचे संघटन करणे.
२) महिलांच्या क्षमता विकसीत करणे.
३) महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे.
४) उद्योजकीय विकास घडवून आणणे.
५) रोजगाराच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे.
६) महिलांचा शिक्षण व सत्तेत सहभाग वाढविणे.

**महिला आर्थिक विकास महामंडळाचे कार्य:-**

महिलांच्या सर्वांगीण विकासा करिता कार्य करणाऱ्या माविम या संस्थेचे सदर प्रकल्पात महत्वाचे स्थान आहे. या कार्यक्रमांसाठी माविम खालील कार्य घटकांवर काम करते -

1) स्वयंसहायता बचत गट स्थापन करणे.
2) लिंग समभाव संचेतना.
3) कार्यात्मक साक्षरता
4) सामाजिक जाणिव जागृती.
5) उद्योजकता विकास कार्यक्रम.

**1) स्वयंसहायता बचत गट स्थापन करणे:-**

ग्रामीण भागातील निर्धन, गरीब व विशेषतः महिलांना काटकसर करून बचतीची सवय लावणे. सामुहीक बचतीच्या निधीतून कर्ज घेवून तातडीच्या गरजा भागविणे व कर्जाद्वारे विकास साधण्याची त्यांच्यात शिस्त रूजविणे व तद्नंतर बँकाशी संलग्न करणे अश्या नियोजन पध्दतीने गरीब महिलांचा विकास साधण्याचे स्वयंसहायता बचत गट हे एक महत्वपूर्ण साधन आहे. स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून बऱ्याच महिलांनी छोटे-छोटे व्यवसाय किंवा जोड धंदे देखील सुरू केलेले आहेत.

**2) लिंग समभाव संचेतना:-**

कुटूंबात किंवा समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणावयाचा असेल तर प्रथम स्त्री पुरूष यांच्यातील लिंगभेद नष्ट करायला पाहिजे. भारतात पुरूष प्रधान संस्कृतीचे मान ठेवून जागोजागी व वेळोवेळी स्त्रीला निम्न दर्जा भारतात पुरातन काळापासून देण्यात आला आहे. या भेदाला नष्ट करणे अत्यंत जरूरीचे आहे. स्त्रीला व्यक्तीगत स्तरावर आत्मनिर्भर बनविणे जरूरीचे आहे. यासाठी स्त्रियांनी आवाज उठवायला पाहिजे. अन्यायाविरूध्द झटण्याचे मनोबल वाढविणारे कार्यक्रम गटाद्वारे घेतले जातात.

**3) कार्यात्मक साक्षरताः-**

लिहता वाचता आले म्हणजे व्यक्ती साक्षर झाली असे म्हणता येणार नाही कारण त्यातून त्याची गुणवत्ता सुधारेलच असे नाही. कारण अशा साक्षरतेचा उपयोग उत्पन्न वाढविणे किंवा जीवनमान उंचावणे यासाठी केला जात नाही. लिहता वाचताच येत असणाऱ्या किंवा उपरोक्त उच्च शिक्षण न घेतलेल्या स्त्रियांना अप्रत्यक्षपणे फार कमी प्रमाणात हक्क पध्दतीने काम करण्याचा अनुभव येत असतो. कार्यात्मक साक्षरता मुळे जीवनावश्यक गरजांची पुर्तता निर्माण करू शकतो. माणसातील कौशल्य व क्षमतांची, अर्थाजनाची समाजात जगण्याची व नागरीकत्वाचे कर्तव्य पार पाडण्याची गरज पुर्ण करत असेत तर कार्यात्मक दृष्टया साक्षर म्हणावे.

**4) सामाजिक जाणीव जागृतीः-**

महिलांच्या विविध प्रश्नाप्रती त्यांना जागृत करणे, त्यांना त्यांच्यासाठी केलेल्या विविध कायदे, योजना आणि कार्यक्रम तसेच हक्क व अधिकार यांची माहिती देण्याच्या हेतूने महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महाराष्ट्रात महिलांसाठी जाणिव जागृती कार्यक्रम राबविण्यात येतो.

**5) उद्योजकता विकास कार्यक्रमः-**

उद्योगासाठी इच्छुक महिलांना योग्य प्रशिक्षण देण्यात येतो. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हे दोन आठवडे कालावधीचे असून उमेदवारामध्ये उद्योजकता प्रवृत्ती विकसीत करणे, त्यांचे व्यवस्थापकीय कौशल्य वाढविणे व त्यांच्या व्यावसायीक ज्ञानात भर घालणे इ. उद्येशाने उद्योजकता विकास कार्यक्रम राबविले जातात.

**बचत गटांच्या माध्यमातून महिलांमध्ये झालेले परिवर्तनः-**

1) महिलांना 'स्व महत्वाची व संघटनेची जाणीव होऊन सक्षम झाल्या आहेत.
2) महिलांचा आत्मविश्वास उंचावलेला आहे.
3) संवाद साधण्याचा कला/कौशल्य वाढ झाली आहे.
4) निर्भिडपणे कुटुंब, गट, सभेमध्ये मत मांडून कारणमिमांसा करतात.
5) स्वतःच्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक परिस्थिती विषयी कारणमिमांसा करण्याच्या क्षमतेत वाढ झाली आहे.
6) बँक/ शासकीय यंत्रणा व गटाच्या माध्यमातून व्यक्तिगत, कौटुंबिक, गट व गांव सोडविण्यात क्षमतेत वाढ झाली आहे.
7) कुटुंबाच्या उत्पन्न व खर्चाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला आहे.
8) कुटुंबाच्या आर्थिक समस्या सोडविणे व उत्पन्नात वाढ करणे हयात महिलांच्या प्रत्यक्ष सहभाग वाढला आहे.
9) महिलांमुळे त्यांचा कुंटुबाची बँकेत/ गावात पत उंचावली आहे.
10) पती व परिवारातील सदस्य बैठकीत वैचारिक निर्णय देण्यात वाढ झाली आहे.
11) आर्थिक हिशोब ठेवण्याची सवय लागली व व्यावहारीक आत्मविश्वास वाढला आहे.
12) स्थानिक पातळीवरील संस्थामध्ये प्रतिनिधीत्व झाले आहे. (जसे - ग्राम पंचायत, शाळा सुधार समिती व गाव समित्या इत्यादी मध्ये)
13) सामाजिक प्रश्न व गांव संघटन कार्यात सहभाग व सहकार्य वाढले आहे.
14) सामुहीक निर्णय घेण्याची क्षमता वाढली.
15) संगठन तयार होवून नेतृत्व विकास झाला.

**बचतगट आणि स्वयं रोजगाराची संधीः-**

जागतिकरीकरणाच्या प्रक्रियेत रोजगार संधी कमी होतांना स्वंयसहायता गट रोजगार संधीत वाढ करीत आहे. म्हणून महिलांचे आर्थिक सबलीकरण गटाद्वारे होईल. बचतगट अत्यंत गरीब आणि संकटात असलेल्या महिलांना तसेच पुरूशांना सहभागी झाल्यानंतर त्यांना कर्ज उपलब्ध होत असते. घरगुती किंवा खावटी कर्जापर्यंत हा मर्यादित नसून त्यांना मिळणाऱ्या कर्जाचा उपयोग त्यांनी स्वतः आपल्या पायावर उभे राहण्याच्या हेतुने केला पाहिजे. त्यासाठी योग्य उद्योग तसेच जोडधंदा केल्याशिवाय पर्याय नाही. स्थानिक गावात उपलब्ध साधन-सामुग्रीचा उपयोग मात्र मोठया प्रमाणात झाल्या पाहिजे. जसे की, चारापानी उपलब्ध असल्यास दुधवाले, बकरीपालन, मेंढीपालन, कुक्कुट पालन तसेच माल विक्री करणे इत्यादी, भाजीपाला विकणे, वाळलेल्या मिरच्या विक्री करून त्याचे पावडर विकणे, रेडीमेट कपडे तयार करून विकणे, स्थानिक उपलब्ध माती, रेती, गोटे यांचा वापर करून वस्तू तयार करणे.

गटस्तरावर किंवा सामुहिक स्तरावर उपयोगाची निवडा चुनाव करून गटातील लोकांना रोजगार उभा करून देणे, अनावस्यक वस्तू उत्पादन वन भागात गांव जंगलावर आधारित साधनांचा उपयोग करणे, वाक, काडया, फळे, पाने इत्यादीवर आधारित उद्योगासाठी प्रोत्साहन देणे. तेव्हाच खऱ्या अर्थाने गटाचा भविष्य उज्वल होईल. त्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र आणि महाराष्ट्र उद्योग जनता विकास केंद्र, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई, राष्ट्रीय महिला कोष, इंदिरा महिला योजना, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, जागतिक महिला बँक हे सर्व मदत करतात. त्याशिवाय उद्योग कशाप्रकारे केल्या जाते. त्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन, अंदाजपत्रक दुसऱ्या आवश्यक गोष्टीसाठी प्रशिक्षण दिल्या जाते. गटात होणारे मर्यादित रक्कमेचा उद्योगात केल्यावर अल्प कालावधी मोठया प्रमाणात वृध्दी होऊ शकते. तेव्हा उत्पादन क्षेत्रात बचतगटाच्या रूपांचा कशाप्रकारे उपयोग केला जाऊ शकतो याचा नेहमी अभ्यास बचतगटाच्या माध्यमाने होणार आहे. एस.जी.एस.वाय. सारख्या योजनेत केवळ 10 सदस्यांचे गट अपेक्षित असून या योजने अंतर्गत उद्योग धंद्यासाठी बँक मोठया प्रमाणात भांडवल उपयोगात आणणार आहे.

**महिला आर्थिक सबलीकरणः-**

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियाकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रांत काम करत असतात, परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

**महिला सक्षमीकरणाचे विविध उपक्रमः-**

2001 हे वर्ष भारताने महिला सशक्तीकरण वर्ष म्हणून घोषित केले. या वर्षात महिलांना सक्षम बनविण्यासाठी खालील बाबींवर भर देण्यात आले आहे.

1) महिलांच्या विकासासाठी कार्यक्रम, योजना तयार करणे तसेच या कार्यक्रम व योजनांना गतिमान करणे
2) महिलांप्रती होणारे द्रुव्यवहार, हिंसाचार, अत्याचार कमी करण्यावर भर देणे.
3) महिलांना कौटुंबिक, आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनविणे.
4) देशातील महिलांसाठी असे चित्र निर्माण करायचे की, त्यामुळे त्यांना सामाजिक आणि आर्थिक धोरण निर्मितीत सहभागी करून घेण्याबाबत जाणीव निर्माण करणे.
5) महिलांच्या शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा यावर सहभाग निश्चीत करणे.
6) पुरुषांप्रमाणे महिलांना सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्ट्या समान अधिकार देणेवरील सर्व बाबींवर महिला सक्षमीकरण वर्षामध्ये भर देण्यात आले.

**स्त्री-सक्षमीकरणाच्या योजनाः**

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसाहाय्यता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

**स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत पुढील मुद्दे प्रामुख्याने महत्त्वाचे ठरतात**

१. लैगिक आरोग्य
२. नैसर्गिक साधनसंपत्तीची राखणावळ
३. आर्थिक सक्षमता
४. शैक्षणिक सक्षमता
५. राजकीय सक्षमता
६. आर्थिक बचतगट
७. मानसिक सक्षमता

**शासनाच्या योजना (उदाहरणे):**

- **महिला बचत गट:** महिलांना एकत्र आणून आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.
- **सुकन्या समृद्धी योजना, माझी कन्या भाग्यश्री योजना:** मुलींच्या शिक्षणाला आणि भविष्याला पाठिंबा देणे.
- **प्रधानमंत्री मातृ वंदना योजना:** माता आणि बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे.

थोडक्यात, महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांचा सर्वांगीण विकास साधणे आणि त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्रिय आणि समान भूमिका बजावण्यासाठी सक्षम करणे होय.

**निष्कर्ष:-**

आज स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांच्या स्थितीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाल्याचे दिसून येत आहे. त्यांना आज पुरुष्यांच्या बरोबरीचे स्थान मिळत आहे. ही एक स्वागत करण्यायोग्यच बाब आहे. परंतु असे असले तरी आज सुद्धा सर्वच क्षेत्रात महिलांप्रती अनेक बाबतीत असमानता दिसून येते. जोपर्यंत ही असमानता नष्ट होत नाही, तोपर्यंत स्त्री सक्षमीकरणाचे धोरण यशस्वी होणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सुची:-**

१) अनामिका, 'स्वाधीनता का स्त्री पक्ष', राजकमल पब्लिकेशन, दिल्ली.
२) अंन्सारी एम. ए., 'राष्ट्रीय महिला आयोग व भारतीय नारी' पूणे प्रकाशन, 2001.
३) बाळसराफ कुसुम, 'स्वयं सहाय्यता बचत गट व त्यात शासकीय यंत्रणाची भूमिका', 2006
४) देशपांडे एम. व्ही., 'स्त्री विषयक माहिती', पूणे पब्लीकेशन्स प्रकाशन 1998.
५) डॉ. दिनेश कुमार, 'भारतीय समाज में महिला सशक्तीकरण', विश्वकर्मा जे. टी. एस.
६) इन्द्रराज सिंह, 'महिला सशक्तीकरण', डायमंड पब्लिकेशन
७) कृष्ण चंद्र चौधरी, 'महिला सशक्तीकरण', सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार
८) डॉ. के. एम. मालती, 'स्त्री विमर्श: भारतीय परिपेक्ष', वणी प्रकाशन, दिल्ली, २०१२ प्रकाशन, दिल्ली
९) डॉ. उपमा शक्सेना, 'महिला सशक्तीकरण', अध्यायान प्रकाशन, दिल्ली
१०) योजेंद्र शर्मा, 'महिला सशक्तीकरण: दशा और दिशा', लोकभारती प्रकाशन